Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए फा.प्लॉ.नं.१७८ १७९
ई बालभारती शेजारी आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा
शिवाजीनगर पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे

क्रमांक रा.मं./ परीक्षा-५/ 3380
पुणे. ४११००४.
दिनांक - ११/०८/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय:-आगामी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियानाअंतर्गत शपथ घेणेबाबत.

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, आगामी फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी आपल्या अधिनस्त सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दि. १५ ऑगस्ट, २०२६ रोजी ध्वजारोहणाचे वेळी सर्व विद्यार्थ्यांनी शपथ घेणेबाबत आपल्या स्तरावरून सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करावे.

शपथ प्रपत्र सोबत जोडले आहे.

(मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने)

(डॉ. दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे.

सोबत:- शपथ प्रपत्र

प्रत माहितीस्तव :-

मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

जा.क./पु.वि.मं/उमा आ/ 8103.
दि. 12.०८.२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा- पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

उपरोक्त राज्य मंडळ प्रकटनाच्या अनुषंगाने फेब्रु- मार्च २०२७ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र. इ.१२ वी परीक्षा निकोप , कॉपीमुक्त वातावरणामध्ये पार पडावी याकरिता आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी दि.१५.०८.२०२६ रोजी ध्वजारोहणाचे वेळी सोबत दिलेली शपथ घेण्यात यावी.

MBRaut
(डॉ. मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-०५

CP.T.02

# विद्यार्थ्यांनी घ्यावयाची शपथ

मी शपथ घेतो की, मी फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही.

जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन. परीक्षेला सामोरे जाताना मंडळ सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करेन. मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. तसेच परीक्षेस आत्मविश्वासाने, निर्भिडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई वडीलांचे व गुरूजनांचे नाव उज्ज्वल करेन.

जय हिंद!- जय महाराष्ट्र!